# श्रीएकनाथमहाराजकृत चतुःश्लोकी भागवत विवरण

**डॉ. श्री. द. देशमुख**

।।श्री।।

# प्रकाशकीय

संतश्रेष्ठ श्रीएकनाथमहाराजविरचित, मूळ संस्कृत श्लोकांवरील प्राकृतातील ओव्यांचा सार्थ ग्रंथ साधकांच्या हाती देताना आम्हास अतिशय हर्ष होत आहे. नाथ महाराजांच्या भाषेचे वैशिष्ट्य म्हणजे ती सोपी पण अर्थपूर्ण आहे. प. पू. श्रीगुरू काकांनी ओव्यांच्या अर्थाचे पदर आणखी सोपेपणाने उलगडून दाखविले आहेत.

अक्षरजुळणीचे काम रत्नागिरीच्या डॉ. ज्योत्स्नाताई पाटणकर व पुण्याच्या सौ. प्रज्ञा कुबडे ह्यांनी समर्थपणे पेललेले आहे. त्यांचे आम्ही ऋणी आहोत. प्रुफे तपासण्याचे व अर्थ पाहण्याचे काम सौ. पद्मजा केळकर व सौ. गीतांजली घायाळ यांनी पूर्ण केलेले आहे. तसेच अन्य तांत्रिक बाबी सांभाळण्याचे काम कु. मेधा कुलकर्णी व श्री धनंजय लोहोकरे यांनी पूर्ण केले आहे. मुद्रणप्रत तयार करण्याचे काम डॉ. अशोका भोंगळे यांनी केले आहे. या सर्वांचे आभार.

आम्हां सर्वांस आशा आहे की गुरुपौर्णिमेनिमित्त प्रसाद भेट म्हणून हा ग्रंथ सर्वांना आवडेल. सर्व साधक बंधू-भगिनींना मोक्षाप्रत जाण्यास हा ग्रंथ साहाय्यभूत होवो, ही ईशचरणी नम्र प्रार्थना!

श्रीकृपा प्रकाशन
नागपूर

।।श्री।।

## ।।चतुःश्लोकी भागवत।।

### प्रस्तावनापर चार शब्द

'चतुःश्लोकी भागवत' हे चार श्लोकात सामावलेले भागवताचे सार आहे. त्यातील पहिला श्लोक सांगण्यापूर्वी श्रीनाथमहाराजांच्या चारशे एकेचाळीस ओव्यांचे प्रास्ताविक असल्यासारखे आहे. तेथून पुढे एक हजार छत्तीस ओव्यांपर्यंत चार श्लोकांवरील टीका आहे. मुख्य चार श्लोक व त्यांचा अर्थ -

अहमेवासमेवाग्रे नान्यद्यत्सदसत्परम्।
पश्चादहं यदेतच्च योऽवशिष्येत सोस्म्यहम्।।१।।

पदच्छेद - अहम् एव आसम् एव अग्रे न अन्यत् यत् सत् असत् परम्।
पश्चात् अहं यत् एतद् च यः अवशिष्येत सा अस्मि अहम्।।१।।

अर्थ - सृष्टी उत्पन्न होण्यापूर्वी केवळ मीच सत् म्हणजे सूक्ष्मतर रूपाने, असत् म्हणजे नश्वर स्थूळ रूपाने व परम् म्हणजे ह्या दोन्हींच्या अतीत निर्मळ रूपाने आहे (होतो). सृष्टीनंतरही जे काही आहे ते माझ्या रूपानेच उरते.

ऋतेऽर्थे यत्प्रतीयेत न प्रतीयेत चात्मनि।
तद्विद्यादात्मनो मायां यथा भासो यथा तमः।।२।।

पदच्छेद - ऋते अर्थे यत् प्रतीयेत न प्रतीयेत च आत्मनि।
तत् विद्यात् आत्मनो मायां यथा भासो यथा तमः।।२।।

अर्थ - मुळात नसलेला पदार्थ माझ्या स्वरूपात प्रत्ययाला येत आहे. मायेमुळे तसेच होते असे समजावे. सूर्य मावळताच अंधार भासतो त्याप्रमाणे.

यथा महान्ति भूतानि भूतेषूच्चावचेष्वनु।
प्रविष्टान्यप्रविष्टानि तथा तेषु न तेष्वहम्।।३।।

पदच्छेद - यथा महान्ति भूतानि भूतेषु च उच्चावचेषु अनु।
प्रविष्टानि अप्रविष्टानि तथा तेषु न तेषु अहम्।।३।।

अर्थ - ज्याप्रमाणे पाच महाभूते उच्च, नीच अश्या सर्व प्राण्यांच्या शरीरात प्रवेश करतात व करीतही नाहीत, त्याप्रमाणे मी त्यांच्यात आहे पण ती माझ्यात नाहीत.

एतावदेव जिज्ञास्यं तत्त्वजिज्ञासुनात्मनः।
अन्वय व्यतिरेकाभ्यां सत्स्यात्सर्वत्र सर्वदा।।४।।

पदच्छेद - एतावत् एव जिज्ञास्यं तत्त्वजिज्ञासुन् आत्मनः।
अन्वय व्यतिरेकाभ्यां सत् स्यात् सर्वत्र सर्वदा।।४।।

अर्थ - आत्मतत्त्व जाणू पाहणाऱ्याने, अन्वय व्यतिरेकाच्या रीतीने एवढेच जाणावयाचे आहे की सत् हे सर्वत्र व सर्वकाळ कसे व्यापून आहे.

सृष्टीपूर्वी, सृष्टिकाळी व सृष्टीनंतर एक आत्मरूप श्रीकृष्ण सतत आहेत. श्रीकृष्णाशिवाय जे काही अनुभवाला येते ते मायिक असून ते ज्ञानाच्या प्रकाशात लुप्त होते. ज्याप्रमाणे सर्व प्राण्यांच्या शरीरात पाच महाभूते असतात व त्या प्राण्यांच्या मृत्यूनंतर ती त्यांच्या मूळ रूपात विलीन होतात, त्याचप्रमाणे भ. श्रीकृष्ण त्या प्राण्यांच्या देहात अलिप्तपणे राहून पुन्हा जणू बाहेर पडतात. ते त्यांच्यात असतातही व नसतातही. जेथे सृष्टी असते तेथे आत्मा असतो पण आत्मा असतो, तेथे सृष्टी नसते. सृष्टीत आत्म्याचा अन्वय व आत्म्यात सृष्टीचा व्यतिरेक आहे. असा हा आत्मा सर्वव्यापक आहे. चार श्लोकांचे हे सार आहे.

श्रीगणेश, शारदा व श्रीगुरूंना वंदन करून नाथमहाराज श्रीगुरूंचे व त्यांच्या सेवेचे माहात्म्य सांगून ओवीरचनेच्या कर्तृत्वासंबंधी परिहार देतात. जड, मूढ व भांबावलेल्या ब्रह्मदेवाला सृष्टीच्या निर्मितीचे ज्ञान नव्हते. त्यामुळे निर्माण झालेल्या अनिवार तळमळीतून त्याने भगवंताचा धावा केला. अशा प्रकारे प्रदीर्घ काळ गेल्यानंतर ब्रह्मदेवाला 'तप तप' असे शब्द ऐकू आहे. पण ते शब्द उच्चारणारा मुळीच प्रगट झाला नाही. तेव्हा त्याने त्या शब्दांचे स्वतःच्या अन्तःकरणात चिंतन केले. विचार करता करता असे लक्षात आले की स्नान, दान, वेदाभ्यास, योग, याग ह्यांना तपाचे मूल्य नसून वासनात्यागपूर्वक सगुण श्रीहरीचे चिंतन हेच तप आहे. दंभ, लोभ, अहंकार, क्रोध इत्यादिकांचा त्याग झाला तर तप सिद्धीला गेले असे म्हणता येते. चंचल मनाची अनिवार गती स्वस्थ करून ती चिदाकार झाली की तपाचे फळ मिळाले असे समजावे. विकल्परहित रीतीने श्रीगुरुसेवा केली असता आत्मज्ञान होते. जेथे येरझारीची गति कुंठित होते ते वैकुंठ हे आत्मज्ञानाचे घर आहे. त्या वैकुंठात पतिव्रता राहत असून श्रीलक्ष्मीही श्रीहरीची सेवा करीत, हरिगुणांचे संकीर्तन करते. ह्या वैकुंठलोकात श्रीविष्णूचे सेवक (पार्षद) राहतात. ब्रह्मदेवाला श्रीहरीचे भव्य व शोभायमान दर्शन वैकुंठातच झाले. त्याने सृष्टिनिर्मितीची सर्व तत्त्वे श्रीहरीपाशी पाहिली व सृष्टिनिर्मितीही पाहिली. यश, श्री, औदार्य इत्यादी सहा गुणांनी श्रीहरी संपन्न असून त्याच्या भक्तांनाही ते गुण लाभतात. ह्या सर्वामुळे अहंकाररहित झालेल्या ब्रह्मदेवाने श्रीहरीला वंदन केले व स्वरूपज्ञानाची प्रार्थना केली. श्रीहरीने ब्रह्मदेवाला विचारले की सृष्टिनिर्मितीची आज्ञा झाली असता, तो स्वरूपज्ञानाची अपेक्षा का करीत आहे? ब्रह्मदेवाने उत्तर दिले की स्वरूपज्ञानाशिवाय एवढ्या मोठ्या कृतीचा अहंकार न होणे शक्य होणार नाही. अशी अनेक प्रकारे स्तुती केल्यावर श्रीनारायण प्रसन्न झाले व श्रद्धाळू, सात्त्विक, गुरुसेवक, ईषणारहित, वासनारहित ब्रह्मदेवाला ज्ञान सांगावयास ते तयार झाले. तत्त्वज्ञानाचे रूपांतर अनुभवज्ञानात होण्यासाठी भक्तीची नितान्त आवश्यकता आहे. स्मरण, कीर्तन, पठण, सर्वाभूती भगवद्भाव, चरित्रगायन, लीलाकथन, पूजा, स्तवन, चिंतन, परिपूर्ण शरणागती ह्या सर्वांची अनिवार आवश्यकता आहे.

ही सर्व आवश्यक त्या अधिकाराची सामग्री पाहून श्रीनारायणाने चारच श्लोकात आत्मज्ञान शब्दबद्ध केले. संस्कृत भाषेतील ह्या चार श्लोकांवर श्रीएकनाथ महाराजांनी ओवीबद्ध मराठी टीका श्रीजनार्दनस्वामींच्या कृपेने केली. त्यात आत्मज्ञानाचे मूळ, साराचेही सार, वेदान्ताला न कळणारे गुह्य ह्यांचा पूर्ण बोध आहे. अनादी, आद्य, नित्य, सत्य, अज, अजर, अमर, सत्, चित्, आनंदघन, विभु, अमेय, अपादपाणि, अनेत्र, अजिव्ह, निर्विकार, निरवधि इत्यादी प्रकारे त्या तत्त्वाचे वर्णन केले गेले आहे.

प्रास्ताविकाच्या सुरवातीला चार श्लोक व त्यांचा सरलार्थ दिला असून त्यावर श्रीनाथमहाराजांनी सविस्तर, रसाळ, उद्बोधक असे उत्कृष्ट भाष्य केले आहे. त्या ओव्यांचा यथामती अर्थ, चालू मराठी भाषेत दिला आहे. तो अभ्यासकांना आवडेल असा विश्वास वाटतो. शेवटी गुणदोषांचा विचार वाचकांकडेच सोपवलेला बरा. कारण त्यांच्या मुखातून ईश्वरच बोलेल असा विश्वास वाटतो.

डॉ. श्री. द. देशमुख

***